# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय – रस्ते व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा़ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.२०/०२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. २०/०२/२०२४ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह तरतूद रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते व पदपथ दुरुस्ती | रु. ७६८.७३ लक्ष | रु. ७६८.४८ लक्ष | रु.०.२५ लक्ष | (७५०+१७.७३ = ७६८.७३ लक्ष) |
| | एकूण | रु. ७६८.७३ लक्ष | रु. ७६८.४८ लक्ष | रु.०.२५ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. दि.१६/०२/२०२४ रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक सा़ो. यांचे दालनात झालेल्या चर्चेमध्ये खालील काम करणे महत्वाचे असल्यामुळे रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये इतर लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करुन विषयांकित कामाकरीता निधी उपलब्ध करुन करणेबाबत मौखिक निर्देश दिलेले आहेत. सदर कामाचे अंदाजपत्रक रु.२,२२,६२,३००/- इतक्या रक्कमेचे आहे. मात्र रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणेकामी गरजेचे आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च " या लेखाशिर्षामधुन रु. २२२.६३/- लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे. | रु. २२२.६३/- लक्ष | |
| एकूण | रु. २२२.६३/- लक्ष | |

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. २०/०२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजनाच्या रक्कमेसह | दि. २०/०२/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च | रु.६००.०० लक्ष | रु.३७०.०० लक्ष | रु.२३०.०० लक्ष | रु.२२२.६३ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे. विषयांकित काम करणे आवश्यक असल्यामुळे पुनर्विनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.२ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर कामाकरीता मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी पुनर्विनियोजन करणेस मौखिक निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षामधून रु.२२२.६३ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक २२ /०२ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ३७६ **दिनांक**२८/ ०२ /२०२४

प्रभाग समिती क्रमांक ०२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणेबाबतचे काम करणे गरजेचे असल्याने रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षामधून एकूण रु.२२२.६३ लक्ष रुपयाचे रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय:- प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे.**

उपरोक्त विषयानुसार प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ् इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यत रस्ता विकसित करणे करिता सर्व्हे नं.१८८(p), १५६(p), १५७(p),१५८(p),७(p), ५(p),४(p), ,९(p),३(p)२(p),१ या सर्व्हे मधिल बाधित होणारी जागा संपादित करण्याचे काम नगररचना विभागा मार्फत सुरु आहे. सदरील रस्ता हा ११०० मी.लांब व ३० मी.रुंद अशा स्वरुपाचा असुन मनपा मार्फत विकसित करणे कामी मा.आयुक्त सो.यांनी याकामा करिता अंदाजपत्रक बनविण्याचे मौखीक आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने याकामी रक्कम रु.२,२२,६२,३००/- (दोन कोटी बावीस लाख बासष्ट हजार तीनशे) इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो.यांनी दि. २८ /०२/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे.
तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:-३६६ दिनांक :-२८/०२/२०२४

प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ् इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यत रस्ता विकसित करणे कामी रक्कम रुपये २,२२,६२,३००/- (अक्षरी दोन कोटी बावीस लाख बासष्ट हजार तीनशे मात्र) इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याण रोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ् इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यत रस्ता विकसित करणे कामास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन केंद्र क्र.३ ची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन केंद्र क्र.३ ची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. रु.४५,१८,९८४/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

**ठराव क्र.** 366

**दिनांक :-** 09 /03/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन केंद्र क्र.३ ची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. रु.४५,१८,९८४/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि.वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन केंद्र क्र.३ ची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. रु.४५,१८,९८४/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका,भिवंडी.

**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेकामी कामाच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये **"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास"** या योजनेअंतर्गत अ.क्र.३ येथी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र.७,८,११,२७ च २९ निजामपूर येथील शांळांच दुरुस्ती करणे रक्कम रुपये २००.०० लक्ष या कामांस कार्यारंभ आदेश दिला नसल्यास सदर काम रद्द करून त्याऐवजी खालील नमूद कामास शुध्दीपत्रान्वये शासनाकडून मंजूरी देण्यांत आलेली आहे.

विषयांकित कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२४,९९,९६७/- इतकेचे प्रस्ताव तयार करून मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांचे मंजूरी करीता सादर करण्यांत आले असता, सदर प्रस्तावास कार्यकारी अभियंता,मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्य शिफारसी प्रमाणे मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी दि. ०४/०८/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय मान्यते करीता मा.जिल्हाधिकारी सो, ठाणे यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामी प्रशासकीय ठराव क्र.२४३ दि. ०९/०८ /२०२३ अन्वये मान्यता मिळाली आहे. तद्नंतर सदर कामास मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडुन क्र./नवि/टे-४ भि.नि.मनपा/प्र.मा/एस.आर-३३७/२०२३ दि.११/०१/२०२४ अन्वये मिळाली असून सदर कामाची ई निविदा महाटेंडर संकेत स्थळावर दि. २५/०१/२०२४ ते ०९/०२/२०२४ पर्यंत प्रसिध्द केली. दिनांक १२/०२/२०२४ रोजी सदर ई निविदा मा. निविदा समिती समक्ष उघडली असता तीन ठेकेदारांची दरपत्रक प्राप्त झाले असून कागदपत्र छाननी अंती पात्र दोन निविदाकारांची दि.२१/०२/२०२४ रोजी प्राईज बीड उघडली असता, मे. बुबेरे ॲन्ड असोसिएटस यांनी सादर केलेले दरपत्रक अंदाजपत्रकीय रु.१,२४,९९,९६७/- दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने म्हणजेच रु.१,२४,९८,७१७/- मात्रचे असल्याने सदर निविदाकाराच्या निविदेतील दरांना मान्यता मिळणेकामी ठराव मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र.:-** ३७९ **दिनांक :-** ९ /०३ /२०२४

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेबाबत कामी शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- २०२२/प्र.क्र.२३६ (११४)/नवि-१६ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ११ जुलै २०२३ अन्वये रु. २ कोटी निधीची मंजूरी प्राप्त झालेली आहे. उपरोक्त नमुद कामाचे प्रस्तावास कार्यकारी अभियंता,मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,कडील शासन आदेश क्रमांक एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४,दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार मी अजय वैद्य, प्रशासकीय तथा आयुक्त,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरील नमुद कामाच्या निविदेतील मे. बुबेरे ॲन्ड असोसिएटस यांनी सादर केलेले दरपत्रक अंदाजपत्रकीय रु.१,२४,९९,९६७/- दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने म्हणजेच रु.१,२४,९८,७१७/- मात्रचे असल्याने निविदाकराच्या निविदेतील दरांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका,भिवंडी.**

H:\मुलभूत निधी अंतर्गत ठराव..doc

जा.क्र.भिनिशमनपा/लेखा/२५४, दि.२२.०२.२०२४ च्या पत्रान्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांची दि.२३.०२.२०२४ रोजी प्रशासकीय समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त, अतिरीक्त आयुक्त, उपायुक्त (मु.), उपायुक्त (कर), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, शहर अभियंता, सहा.संचालक (नगररचना) व नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख, इ. उपस्थित होते. या प्रशासकीय समितीच्या बैठकीमध्ये सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर साधकबाधक चर्चा करण्यात आलेली आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ३८०

दिनांक ०९/०३/२०२४

विषय : सन २०२२-२३ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२४-२५ करीता मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एम.सी.ओ.2002/प्र.क्र.71 (भाग 2)/नवि-14, दि.06.06.2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क.452 अ च्या तरतूदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार (मा.महासभा व मा.स्थायी समितीचे अधिकार) मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, सन २०२३-२४ चे सुधारीत रु.७९६,३५.१७ लाख व सन २०२४-२५ रक्कम रू.९४२,४१.२६ लाख रकमेचे रु.२५२.२९ लाख शिल्लक दर्शविणारे मुळ अंदाजपत्रकास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क.95 नुसार मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**